# कुंडलमध्ये ९ रोजी 'क्रांतिअग्रणी' राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा : लाड

कुंडल, ता. ६ : महाविद्यालयीन तरुणांच्या वैचारिक अभिव्यक्तीला एक समर्थ व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'क्रांती दिनानिमित्त मंगळवारी (ता. ९ ऑगस्ट) कुंडल येथे सकाळी ९ वाजता 'क्रांतिअग्रणी' राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा होणार असल्याची माहिती स्पर्धेचे निमंत्रक शरद लाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शरद लाड पुढे म्हणाले, ''भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सातारच्या प्रतिसरकारचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. प्रतिसरकारच्या चळवळीचे फिल्ड मार्शल क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या खंबीर नेतृत्वाने राष्ट्रप्रेम, तंटामुक्ती, दारूबंदी, अस्पृश्यता निवारण यासारखे अनेक उपक्रम राबविले. तसेच गुंडशाही, सावकारकी व जमीनदारी समूळ नष्ट करून ही चळवळ समाजाभिमुख केली. या सर्व विचारांचे बीजावरोपण क्रांतिअग्रणींनी केलेले आहे. या वैचारिक अधिष्ठानाचा विचार करता महाविद्यालयीन तरुणांच्या वैचारिक अभिव्यक्तीला एक समर्थ व्यासपीठ मिळवून देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले आहे.''

स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे : स्वातंत्र्य लढा व कष्टकऱ्यांचे झुंझार सेनापती क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड, 'दाबून विवेकाचा- विकास होईल का समाजाचा', 'सोशल मीडिया : एक अभासी दुनिया', 'कौशल्य विकास बेरोजगारीचा प्रश्न सोडवू शकेल का?', 'राजकारणाने व्यापिले अवघे जीवन', 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे!', 'दहशतवाद-अजून किती बळी घेणार?' या विषयावर स्पर्धा आयोजित केली आहे. या वेळी प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, प्रा. डी. एम. होनमाने, प्रा. बी. डी. वाघमारे उपस्थित होते.